पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

तहकुब सभा परिपत्र

स्थायी समितीची तहकूब झालेली सभा (**मंगळवार दि. २२/९/२०२० रोजी** तहकूब केलेली सभा) **गुरुवार, दि. २४/९/२०२० रोजी सकाळी १०:३० ( साडे दहा ) वाजता स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे भरेल.**

सदर सभेत **कार्यपत्रिका क्र. २५ दि. २२/९/२०२० वरील विषय क्र. ५२४ ते ५३४ तसेच खालील दाखल विषय क्र. ५३५ त्वर्यचा** विचार होईल.

**विषय क्र.५३५ त्वर्य**

मा.सौ.वर्षा तापकीर, मा.सौ.मानसी देशपांडे, मा.महेंद्र पठारे, मा.प्रकाश ढोरे, मा.सौ.उज्ज्वला जंगले, मा.सौ.नंदा लोणकर, मा.श्रीमती अमृता बाबर, मा.राजेंद्र शिळीमकर, मा.सुनिल कांबळे, आमदार, मा.सौ.सुनिता गलांडे व मा.दिपक पोटे यांचे दि. २२/९/२०२० चे पत्र.

विषय: सन २०२०-२१ या वर्षात (मोबाईल टॉवर वगळून) मिळकतकरावरील शास्तीवर / व्याजावर अभय योजना लागू करणेबाबत

संदर्भ: १) मा. स्थायी समिती ठराव क्र. १९८२ दि. ०५/०१/२०१६
२) मा. स्थायी समिती ठराव क्र. १३८७ दि. ०४/१०/२०१६
३) मा. स्थायी समिती ठराव क्र. २४७१ दि. १४/०२/२०१९
४) मा. स्थायी समिती ठराव क्र. १५९० दि. २६/११/२०१९
५) मा. स्थायी समिती ठराव क्र. २०६९ दि. २१/०१/२०२०
६) मा. स्थायी समिती ठराव क्र. २२३२ दि. १७/०२ /२०२०

निवासी व बिगर निवासी थकीत मिळकतकर वसुलीसाठी सन २०१९ मध्ये त्वरित अभय योजना राबविणेबाबत मा.स्थायी समितीने ठराव पारित केले आहेत तसेच मा स्थायी समिती व मा.मुख्य सभेत मिळकत कर वसुलीसाठी २% शास्ती/ दंडावर देण्यात येणारी सवलतीची अभय योजना राबविण्यात यावी, याबाबत मा. मुख्य सभेमध्ये अंदाजपत्रकीय चर्चेच्या वेळी अनेक मा. सभासद यांनी सूचीत केलेले आहे.

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये मध्यमवर्गीय कुटुंबांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे, तसेच सध्या आर्थिक मंदी मोठ्या प्रमाणात आहे. यातील अनेक मिळकत धारकांच्या मिळकती अनधिकृत असल्याने अशा मिळकतींची आकारणी ३ पट दराने करण्यात आली आहे. सदर थकबाकीवर दरमहा २% दराने दंडाची आकारणी होत असल्याने थकबाकीची रक्कम मोठ्या प्रमाणावर असल्याचे दिसून येते. तसेच सन २०१९ मध्ये पुणे शहरात मोठ्या प्रमाणवर पाऊस झाल्याने पुणे शहरातील नद्या, नाले, ओढे यांना ब-याच वेळा मोठ्या प्रमाणात पूर आलेला आहे. अनेक झोपडपट्ट्या, इमारती, दुकाने यामध्ये पुराचे पाणी गेल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान व जीवितहानी देखील झालेली आहे. तसेच सद्यस्थितीत मागील सुमारे सहा महिन्यांपासून जागतिक महामारी कोरोना विषाणूच्या प्रसाराचा प्रतिबंध व नियंत्रणाकरिता दि.१७/०३/२०२० पासून देशामध्ये लॉकडाऊन घोषित करण्यात आलेला होता व अद्यापही स्थिती पूर्ववत झालेली नाही. सदर लॉकडाऊन मुळे मोठ्या प्रमाणात कारखाने, उद्योग धंदे तसेच व्यापार-उद्योग व्यवसाय बंद ठेवण्यात आले होते. त्या कारणास्तव आर्थिक उत्पनात घट झालेली आहे. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करता मा. आमदार, मा. सभासद व नागरिक मिळकत कराचे दंडाचे रक्कमेबाबत अभय योजना लागू करणेची मागणी करीत आहे. मा. स्थायी समितीनेही कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या आर्थिक परिस्थितीचे कारणास्तव अभय योजना लागू करणेबाबत ठराव पारित केले आहेत.

वरील वस्तुस्थितीचा गांभीर्याने विचार करून थकीत मिळकतकर वसुलीसाठी अभय योजना राबविल्यास नागरिकांना आर्थिक व नैसर्गिक न्याय मिळून मोठ्या प्रमाणावर थकबाकी वसूल होऊन पुणे महानगरपालिकेचेही आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

यापूर्वी दोन वेळा अभय योजना राबविण्यात आल्या होत्या. त्यावेळी थकीत मिळकतदारांनी शास्ती रक्कमेसह संपूर्ण मिळकतकर भरल्यामुळे मनपाकडे मोठ्या प्रमाणावर मिळकत कर जमा झाला होता.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम शेड्युल चप्टर ८ नियम ४१ अन्वये मिळकतकर मुदतीत न भरल्यास, विहित मुदतीनंतर दरमहा २% शास्ती आकारणी बाबत तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार थकीत मिळकत करावर दरमहा २% शास्ती जमा होवून, सद्यस्थितीत मिळकत कराची थकबाकी मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. वेगवेगळ्या कारणास्तव मिळकतधारकांकडून मिळकत कराचा भरणा केला जात

नाही व त्यामुळे अशा मिळकतींवर दरमहा २% शास्ती जमा होवून मोठया प्रमाणावर थकबाकी व शास्तीची रक्कम जमा होते.

सद्यस्थितीत दिनांक ३१/०८/२०२० अखेर मिळकत कर थकबाकी खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते:-

| अ.क्र. | तपशील | मिळकतींची संख्या | ३१/०८/२०२० अखेर रक्कम रुपये (कोटी मध्ये) |
|---|---|---|---|
| १ | एकूण केवळ मिळकत कराची थकबाकी (मोबाईल टॉवर वगळून ) | ५,३४,४१० | २११७,४२,५५,३३२ |
| २ | एकूण मिळकत कराची २% शास्तीची रक्कम (मोबाईल टॉवर वगळून ) | | २४६८,६६,१७,९०६ |
| ३ | मोबाईल टॉवरची शास्ती वगळता थकबाकी | २,४६६ | ५३१,४७,७०,६७७ |
| ४ | मोबाईल टॉवरची २% शास्तीची रक्कम | | ६२१,९४,०८,४१० |
| मूळ मागणी + २% शास्तीची मिळून एकूण मागणी. | | | ५७३९,५०,५२,३२५ |

ज्या मिळकतीवरील कराची रक्कम मिळकतदारांनी वेळेत भरली नाही त्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे तरतुदीनुसार आकारण्यात आलेल्या २% शास्तीच्या रक्कमेवर यापूर्वी दोन वेळा अभय योजनेद्वारे सवलत दिली आहे. तथापि अद्याप थकबाकी असलेल्या मिळकत धारकांची संख्या मोठी आहे. एकूण मूळ मागणीवर २% शास्तीची रक्कम चक्रवाढ व्याजदराने वाढत असल्याने मूळ मागणी पेक्षा व्याजाची रक्कम जास्त आहे, ही वस्तुस्थिती आहे .

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम परिशिष्ट ८ नियम ५१ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे -**

आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल.

सदरील तरतूदीतील अधिकाराचा वापर करून मिळकत कराची मूळ थकबाकी पूर्णपणे वसूल होण्याच्या दृष्टीकोनातून सदर थकबाकीवर लावण्यात आलेली 2 टक्के शास्तीची रक्कम अभय योजनेद्वारे कमी करून थकबाकी रक्कम मोठ्या प्रमाणात वसूल करणे शक्य होणार आहे. परिणामी ज्या थकीत मिळकतदारांकडून थकबाकीचा भरणा करणेत येऊन ते देखिल इतर नागरिकांप्रमाणे नियमित मिळकत कर भरण्याच्या प्रवाहात येतील.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधानचे नियम ५१ चे अवलोकन होऊन सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे अभय योजना राबविण्यात यावी.

१) सदरील अभय योजना मोबाईल टॉवर वगळून सर्व मिळकतींना लागू राहील.

२) ज्या मिळकतीवर थकबाकी आहे, अशा मिळकतधारकांनी खालील कालावधीत थकबाकीसह संपूर्ण रक्कम एकरकमी भरल्यास भरणा दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या एकूण २% शास्ती रक्कमेच्या खालील प्रमाणे शास्ती रक्कमेत माफी देणेस.

| अ.क्र. | कालावधी | भरणा दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या एकूण २% शास्ती रक्कमेच्या खालील प्रमाणे माफी |
|---|---|---|
| १ | ०२/१०/२०२० ते ३०/११/२०२० | ८० % |

३) सदरील अभय योजनेबाबत जनजागृती होणेकामी एसएमएस / इमेल पाठवणे, रेडिओ, सिनेमागृहे इ. मार्फत जाहीरात देणे, तसेच हॅण्डबील्स, जाहीर प्रकटन, प्रेस नोट देणे, फ्लेक्स बोर्डस, बॅनर्स इ. द्वारे आवश्यकतेनुसार प्रसिद्धी देणे व याकामी येणारा खर्चाची बीले सन 2020-21 चे अर्थसंकल्पातील छ. कर आकारणी व कर संकलन कार्यालय, 3 संकीर्ण चे अर्थशिर्षकावर खर्ची टाकण्यात येतील.

४) मिळकतधारकाने अभय योजना कालावधीत दिलेला धनादेश अनादारीत (बाउन्स) झाल्यास मिळकतधारक अभय योजनेच्या ज्या कालावधीत विहित मार्गाने (रोख, डीडी, ऑनलाईन पद्धतीने) संपूर्ण थकबाकी रक्कम अदा करील त्या कालावधीस लागू असणाऱ्या सवलतीनुसार अभय योजनेचा लाभ देण्यात येईल.

५) कोणत्याही कारणास्तव अभय योजनेच्या कालावधीनंतर येणाऱ्या मिळकतधारकांना अभय योजनेचा लाभ देता येणार नाही.

**प्रभारी नगरसचिव,**

**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

**सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सॲप द्वारे कळविण्यात येईल.**